क्रमांक : का.स./बैठक/२१९

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १२ एप्रिल, २००७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ मार्च, २००७ (शुक्रवार) रोजी झालेल्या २१९ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१२.४.२००७
सचिव,
कार्यकारी समिति

प्रति :

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री.द.म.सुकथनकर,
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री.र.य.तांबे,
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५. - सदस्य

श्री. हरिशंकरन्,
कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१. - सदस्य

अति. मुख्य सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २१९ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १६ मार्च, २००७ (शुक्रवार) |
| वेळ | : | दुपारी १२.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| डॉ.डी.के.शंकरन<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.एन.रामाराव<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| डॉ.टी.चंद्रशेखर<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

डॉ.ज.मो.फाटक
प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.व्ही.के.जयरथ
सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.संजय उबाळे
सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन,

श्री.मिलिंद म्हैसकर
सह-महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
विशेष कार्य अधिकारी (अभियांत्रिकी),
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अडसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.डी.डी.भिडे
मुख्य अभियंता,
मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.मो.रामचंदानी
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २००६ रोजी झालेल्या २१८ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २००६ रोजी झालेल्या २१८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :-

(अ) श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, कार्यकारी समितीने कामाच्या निविदेस मंजूरी दिल्यानंतर संबंधीत विभागाने केलेल्या कार्यवाहीमध्ये केवळ हे काम प्रगतीपथावर आहे असे नमूद न करता कामाच्या प्रगतीची टक्केवारी नमूद करावी.

अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर सूचनेस मान्यता दिली.

(ब) बाब क्र.१६: मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन वसाहतीत प्रकल्पग्रस्तांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनोत्तर कामाचे नियोजन व अंमलबजावणी करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे.जे.पी.एस.असोसिएटस् प्रा. लि. यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास कार्यकारी समितीने मान्यता

..४/-

दिल्यानंतर सदर संस्थेस करारनामा करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी सदर काम करण्यास असमर्थता व्यक्त केली. सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी जागतिक बँकेने आग्रह धरल्यामुळे पूर्वी प्राप्त झालेल्या निविदांनुसार दुस-या क्रमांकावरील सल्लागार मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांचेशी या कामासंबंधात विचारविनिमय करुन त्यांचेकडून सुधारीत देकार घेण्यात आला असून त्यांच्या नेमणूकीचा प्रस्ताव स्वतंत्रपणे या बैठकीत सादर करण्यात आला आहे.

(क) अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी पूर्व मुक्त मार्ग व सहार उन्नत रस्ता या संबंधात विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, ही दोन्ही कामे जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (JNNURM) या योजनेंतर्गत हाती घ्यावयाची असून केंद्र शासनाने तसेच राज्य शासनाने या कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तथापि, पूर्व मुक्त मार्गाच्या कामासाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट यांची मान्यता अद्याप प्राप्त झालेली नाही. यासंबंधात, अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, या दोन्ही कामांसाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे या कामांसाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात यावी.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

<u>बाब क्र.३ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेला पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टप्पा-१अ योजनेसाठी कर्जसहाय्य देणे.</u>

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने विनंती केली आहे की, त्यांच्या पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टप्पा-१अ या रु.७६८५.९६ लाख खर्चाच्या प्रकल्पासाठी प्राधिकरणाने कर्ज उपलब्ध करुन द्यावे. हा प्रकल्प महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केला असून त्यास तांत्रिक मंजूरी दिलेली आहे. तसेच राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने या प्रकल्पासाठी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी सदर महानगरपालिका स्वतः करणार आहे. रु.७६८५.९६ लाख या प्रकल्प खर्चापैकी १०% खर्च भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका

स्वतःच्या निधीतून करणार असून उर्वरीत ९०% म्हणजे रु.६९१७.३६ लाख इतकी रक्कम प्राधिकरणाने कर्ज स्वरुपात द्यावी अशी सदर महानगरपालिकेने विनंती केलेली आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी अधिनियमानुसार प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ९०% पर्यंत रक्कम कर्जाऊ देता येते मात्र कर्ज परतफेडीचा कालावधी १५ वर्षापेक्षा अधिक नसावा व कर्ज परतफेडीचा सूटीचा कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त नसावा अशी बंधने आहेत. तसेच प्राधिकरणाच्या सध्याच्या धोरणानुसार भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस द.सा.द.शे. ८% व्याज दराने कर्ज मंजूर करता येईल. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सदर महानगरपालिकेकडे शिलकी महसूल अपेक्षित असल्यामुळे सदर महानगरपालिका प्राधिकरणाच्या कर्जाची परतफेड करण्यास सक्षम आहे. अशाप्रकारे मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी अंतर्गत रु.६९१७.३६ लाख इतके कर्ज घेण्यासाठी सदर महानगरपालिका पात्र आहे, मात्र त्यासाठी महानगरपालिकेस शासनाची मंजूरी घ्यावी लागेल. त्यानुसार भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेस पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टप्पा-१अ साठी रु.६९१७.३६ लाख इतके कर्ज द.सा.द.शे. ८% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी, बाब टिप्पणीत नमूद केलेल्या कर्जाच्या अटी व शर्तीनुसार, देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**३.२** यासंबंधात श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (JNNURM) या योजनेंतर्गत वित्त सहाय्य देताना काही नागरी सुधारणा (Urban Reforms) करण्यासंबंधी अटी घालण्यात येतात त्याप्रमाणे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यामध्ये सुधारणा करण्यासंबंधी प्राधिकरणाने सुयोग्य अटी घालाव्यात. या सूचनेस अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मान्यता दिली.

**३.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**<u>ठराव क्र.१०२६</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१-अ अन्वये प्राधिकरणाने ठराव क्र.४२२, दिनांक ३१ मार्च,

१९९० द्वारे कार्यकारी समितीस प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेला पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टप्पा-१अ साठी रु.६९१७.३६ लाख इतकी कर्जाऊ रक्कम मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करीत आहे :-

(१) <u>व्याजाचा दर</u> : ८% द.सा.द.शे.

(२) <u>कर्ज परतफेडीचा कालावधी</u> : १५ वर्षे (सूटीचा कालावधी वगळून ज्यामध्ये सरळ व्याज पध्दतीने व्याज लागू होईल).

(३) <u>हमी देणे</u> : महानगरपालिकेने कर्ज व त्यावरील व्याज परतफेड करण्यासाठी हमी म्हणून एस्क्रो खाते उघडणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत या आधी मंजूर केलेल्या कर्जासाठी बीएनसीएमसी, आयआरडीपी टप्पा-१ एस्क्रो खाते, इंडियन बँक, भिवंडी शाखा येथे उघडले आहे व या कर्जाच्या परतफेडीसाठी महानगरपालिकेचे सर्व स्त्रोतातून मिळणारे उत्पन्न या एस्क्रो खात्यात जमा करण्यात येत असून कर्ज परतफेडीचा एक हप्ता कर्जाची हमी म्हणून ठेवून उर्वरीत रक्कम त्याच बँकेच्या इतर खात्यात वळती करण्यात येते. या पध्दतीने महानगरपालिकेने हेच एस्क्रो खाते कायम ठेवून या खात्यात नवीन कर्जाच्या एका हप्त्याची रक्कम प्राधिकरणाच्या प्रस्तावित कर्ज परतफेडीची हमी म्हणून ठेवावी.

(४) <u>कर्ज वितरण व्यवस्था</u> :

(अ) कर्ज करारपत्रावर सहया झाल्यानंतर एकूण मंजूर कर्जाच्या १०% रक्कम वितरीत करण्यात येईल व उर्वरीत ९०% रक्कम उपयोगिता प्रमाणपत्र व विहित नमुन्यातील प्रकल्पावरील त्रैमासिक खर्चाचे प्रमाणित विवरणपत्र तयार केल्यानंतर प्रतिपूर्तीच्या आधारे वेळोवेळी वितरीत करण्यात येईल.

(ब) कर्ज करारपत्र करण्यापूर्वी प्रकल्पावर केलेला खर्च प्रतिपूर्तीसाठी ग्राहय धरला जाईल.

(क) महानगरपालिकेला वितरीत करण्यात येणारी प्रत्येक कर्ज हप्त्याची रक्कम एस्क्रो खात्यात प्रथम जमा केली जाईल.

(५) <u>कर्ज बंद होण्याचा दिनांक</u> : कर्ज करारपत्र झाल्यापासून ३६ महिने किंवा पूर्ण कर्जाची रक्कम वितरीत होणे यापैकी जे अगोदर होईल.

तसेच कार्यकारी समितीने कर्ज मंजूर केल्यावर प्राधिकरण व महानगरपालिका यांच्यामध्ये ९ महिन्याच्या आत कर्ज करारपत्र होणे आवश्यक आहे.

..७/-

(६) <u>व्याजासह कर्जाची परतफेड</u> : प्रति वर्षी ३० जून व ३१ डिसेंबर रोजी अर्धवार्षिक समान हप्त्यात.

(७) <u>कर्जाच्या काही अतिरिक्त अटी व शर्ती</u> :

(अ) महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम १०९ नुसार पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टप्पा-१ अ साठी रु.६९१७.३६ लाख इतके कर्ज प्राधिकरणाकडून घेण्यासाठी कर्ज करारपत्र करण्यापूर्वी शासनाची मंजूरी मिळवावी.

(ब) महानगरपालिकेने कर्जाची रक्कम परतफेड करण्यासाठी एस्क्रो खात्यात प्रस्तावित करण्यात आलेली रक्कम भरणे तसेच प्रकल्पाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी आवश्यक असलेली वार्षिक खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करणे आवश्यक असेल.

(क) प्राधिकरणाच्या लेखी परवानगीशिवाय महानगरपालिकेने कुठल्याही प्रकारचे नवीन कर्ज इतर कोणत्याही संस्थांकडून उभारु नये.

(ड) प्राधिकरण मुंबई प्रांतिक महानगरपालिका कायदा, १९४९ मधील तरतूदींच्या अधीन राहून महानगरपालिकेच्या महसूली जमा रकमेवर प्रथम हक्क बजाविल.

(इ) कर्ज करार करण्यापूर्वी महानगरपालिकेने पाणी पुरवठा वितरण व्यवस्था टप्पा-१अ साठी केलेला खर्च कर्ज वितरणासाठी ग्राहय धरला जाईल.

(फ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४४ अन्वये एरियर्स ऑफ लँड रेव्हेन्यूच्या स्वरुपात प्राधिकरण महानगरपालिकेडून थकीत रक्कम वसूल करु शकेल.

(ग) प्रत्यक्ष कर्ज वितरणाआधी महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक ०७.५.२००५ रोजीच्या तांत्रिक मंजूरीमध्ये उपस्थित केलेल्या तांत्रिक मुददयांची पूर्तता करुन त्याबाबतचे पूर्तता प्रमाणपत्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त करुन प्राधिकरणास सादर करावे.

(घ) नागरी सुधारणा करण्यासंबंधी प्राधिकरणाने विहित केलेल्या अटी महानगरपालिकेवर बंधनकारक असतील.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करणे तसेच कर्जाची रक्कम, व्याज आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्जसहाय्य

..८/-

देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मिठी नदीच्या पूराची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने जलशास्त्रीय अभ्यास करण्याकरीता त्रिमितीय भौतिक प्रतिकृती तयार करण्यासाठी केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र (CWPRS) पुणे या संस्थेची नेमणूक करण्याबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, माहिम कॉजवे ते सीएसटी पूल या वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या भागासाठी त्रिमितीय भौतिक प्रतिकृती केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्राने तयार केली आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाने ठरविल्याप्रमाणे माहिम कॉजवे ते विहार लेक या संपूर्ण मिठी नदीच्या भागातील तसेच वाकोला नाल्यातील पूराची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने जलशास्त्रीय अभ्यास करण्याकरीता केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्राकडून त्रिमितीय भौतिक प्रतिकृती नव्याने तयार करुन घेणे आवश्यक आहे. वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या भागासाठी पूर्वी तयार केलेल्या भौतिक प्रतिकृतीचे प्रमाण (scale) हे आडवे ३०० मध्ये १ व उभे ५० मध्ये १ असे असून या प्रतिकृतीसाठी लागणाऱ्या मूलभूत माहितीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. वाकोला नाल्यासहीत संपूर्ण मिठी नदीसाठी नव्याने तयार करावयाच्या भौतिक प्रतिकृतीचे प्रमाण आता आडवे २०० मध्ये १ व उभे ४० मध्ये १ असे असेल. केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्राने कळविल्याप्रमाणे नव्याने भौतिक प्रतिकृती तयार करण्याचा अंदाजित खर्च रु.४,४८,९२,४७०/- इतका असून त्यामध्ये सेवाकर व एक वर्षाचा काम पूर्ण झाल्यानंतरचा देखभाल खर्च समाविष्ट आहे. सदर रक्कम या संस्थेस आगाऊ देण्याची आवश्यकता आहे. तसेच प्रतिकृतीचे काम पूर्ण करुन त्यावरील अभ्यास पूर्ण करण्याचा कालावधी दोन वर्ष इतका आहे. या तीन वर्षाच्या कालावधीनंतर प्रतिकृतीच्या देखभालीचा खर्च सदर संस्थेस अदा करावा लागेल. केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र ही संस्था केंद्र शासनाची संस्था असल्यामुळे तसेच ही संस्था प्राधिकरणाचे तांत्रिक सल्लागार म्हणून कार्यरत असल्यामुळे, संपूर्ण मिठी नदी व वाकोला नाल्यासाठी त्रिमितीय भौतिक प्रतिकृती तयार करण्याकरीता या संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

४.२ श्री. र. य. तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता प्राधिकरणाचे विशेष कार्य अधिकारी (अभियांत्रिकी) यांनी असे स्पष्ट केले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या भागासाठी यापूर्वी तयार करण्यात आलेल्या त्रिमितीय भौतिक प्रतिकृतीमध्ये भरती, ओहटी, लाटा आदी निर्माण करुन होणा-या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी सन १९७५-७६ च्या कालावधीत उपलब्ध असणा-या संयंत्रांचा वापर करण्यात आला होता. तथापि, दरम्यानच्या कालावधीतील तांत्रिक प्रगतीमुळे लाटा आदी निर्माण करण्यासाठी व त्यांच्या मापनासाठी अधिक अचूक संयंत्रे उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे पाणलोट क्षेत्राची संपूर्ण नवीन त्रिमितीय भौतिक प्रतिकृती बनविल्यामुळे अभ्यासात व त्यावरील आधारीत निष्कर्षात अचूकता आणता येईल. विशेष कार्य अधिकारी (अभियांत्रिकी) यांनी पुढे असेही सांगितले की, सदरील अभ्यासासाठी गणितीय प्रतिकृती यापूर्वीच तयार करुन त्यावर आधारीत अभ्यास पूर्ण करण्यात आला आहे. तथापि गणितीय अभ्यासावर आधारीत निष्कर्षांची सुसंगती पडताळून पाहण्यासाठी त्रिमितीय भौतिक प्रतिकृती तयार करुन त्यावर अभ्यास व निरिक्षणे करणे आवश्यक आहे. अशाप्रकारचा जलशास्त्रीय अभ्यास करणारी केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र ही देशातील एक प्रमुख संस्था असून प्रस्तावित त्रिमितीय भौतिक प्रतिकृतीचा पुढील अभ्यासासाठी उपयोग होणार आहे. नव्या प्रतिकृतीचे काम पूर्ण करुन त्यावरील अभ्यास पूर्ण करण्यासाठी २ वर्षाचा कालावधी लागणार असून मिठी नदीच्या टप्पा-२ मधील उर्वरीत कामे सदर अभ्यासाच्या अनुषंगाने पूर्ण करण्यात येतील. तसेच यापूर्वी ठरविल्याप्रमाणे नव्या प्रतिकृतीसंबंधातील सर्व खर्च प्राधिकरणाने करावयाचा आहे.

४.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०२७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,

..१०/-

कार्यकारी समिती याद्वारे संपूर्ण मिठी नदीची (उगमस्थान विहार तलावापासून माहिम कॉजवेपर्यंत व वाकोला नाल्यासहित) त्रिमितीय भौतिक प्रतिकृती तयार करण्याकरीता केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र या संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर नेमणूक करण्यास तसेच सदर प्रतिकृतीच्या कामासाठी रु.४,४८,९२,४७०/- या रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देत आहे. तसेच प्रतिकृतीच्या कामाची पूर्ण अंदाजपत्रकीय रक्कम काम सुरु करण्यापूर्वी केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्रास आगाऊ अदा करण्यासही मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणातर्फे भारत सरकारच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन, दिल्ली (JNNURM) या योजनेतून मिठी नदीच्या विकासाच्या कामासाठी आर्थिक सहाय्य घेण्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन (JNNURM) या योजनेतून मिठी नदीच्या विकासाच्या कामांसाठी आर्थिक सहाय्य मिळविण्याकरीता वाकोला नाल्यासहीत संपूर्ण मिठी नदीच्या विकासाच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक होते. सदर काम अत्यंत तातडीचे असल्याने एकमेव स्त्रोत या तत्वावर मे.अविनाश डहाणूकर, आर्किटेक्ट यांची सेवाकरासहीत एकूण रु.३,०३,०५०/- इतक्या फी वर नेमणूक करण्यात आली व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम ऑक्टोबर, २००६ मध्ये पूर्ण झाले असून केंद्र शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे.

५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.१०२८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे संपूर्ण मिठी नदीच्या (उगमस्थान विहार तलावापासून माहिम कॉजवेपर्यंत व वाकोला नाल्यासहित) विकासाच्या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे.अविनाश डहाणूकर, आर्किटेक्ट यांची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.३,०३,०५०/- (सेवाकरांसह) इतक्या फी वर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सीएसटी पूलापर्यंत) वाढविणे तसेच मिठी नदी परिसराचा विकास करणे इत्यादींसाठी टप्पा-२ च्या कामांसाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदांना मान्यता देणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र, पुणे यांच्या शिफारशींनुसार व आय.आय.टी., मुंबई यांच्या पर्यावरणविषयक सुधारणांच्या शिफारशींनुसार तसेच सत्यशोधन समितीच्या शिफारशींनुसार मिठी नदी विकास टप्पा-२ अंतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील माहिम कॉजवे ते सीएसटी पूलापर्यंत मिठी नदीच्या सुमारे ६ कि.मी. लांबीच्या पात्राची तसेच वाकोला नाल्याच्या सुमारे १.८ कि.मी. लांबीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे, माहिम कॉजवेजवळ व माहिम कॉजवे ते समुद्रात २.१४ कि.मी. पर्यंत खडक खोदाई, माहिम कॉजवे येथे स्लुईस पध्दतीच्या जलद्वारांची निर्मिती तसेच मिठी नदीवरील ७ पूलांचे रुंदीकरण, जलप्रवाहांच्या उताराची तीव्रता वाढविणे, किना-याच्या दोन्ही बाजूस आवश्यक तेथे संरक्षक भिंत बांधणे तसेच दुतर्फा रस्ते बांधून या प्रवाहांच्या परिसरात

सुशोभिकरण करुन हरितपट्टे विकसित करणे इत्यादी कामांच्या सुमारे रु.५७०.७६ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्राधिकरणाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २००६ रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तिवरांचा भाग वगळता जलमार्गाचे खोलीकरण व रुंदीकरण करावयाचे आहे. तसेच माहिम कॉजवे ते सायन-धारावी पूल ते मिठी नदी व वाकोला नाला लघुसंगमापर्यंत तिवरांचा भाग असल्यामुळे तसेच संरक्षक भिंत बांधण्यासाठी कोरडी जागा उपलब्ध नसल्यामुळे सद्यस्थितीत या ठिकाणी संरक्षक भिंत बांधता येणार नाही. माहिम कॉजवे जवळील समुद्राच्या बाजूला २.१४ कि.मी.पर्यंत खडक खोदाईचे काम जल भूशास्त्रीय सर्वेक्षणानंतर हाती घेण्यात येईल. तसेच मिठी नदीच्या दुतर्फा रस्ते व हरितपट्टे विकसित करण्याचे काम २००८-०९ या वर्षात हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. माहिम कॉजवे येथे स्लुईस पध्दतीचे जलद्वार बांधणे व्यवहार्य नसल्याचे केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्राने कळविल्यामुळे सदर जलद्वार बांधण्याचे काम प्रस्तावित नाही. तसेच मिठी नदीवर असणा-या ७ पूलांच्या रुंदीकरणाचे काम नंतर हाती घेण्यात येईल. त्यानुसार, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मिठी नदी विकास टप्पा-२ मधील वांद्रे-कुर्ला संकुलातील ६ कामे हाती घ्यावयाची असून या कामांची अंदाजपत्रके मे.टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी तयार केली आहेत. श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीने सदर अंदाजपत्रके तपासून त्यांस मंजूरी दिलेली आहे. तसेच ही सर्व कामे मे.टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या देखरेखीखाली करण्यात येणार आहेत. गाळ काढण्याची परिमाणे echo sounding method द्वारे घेण्यासाठी महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड या संस्थेची नियुक्ती करण्यात येईल.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, टप्पा-२ मधील वरील ६ कामांसाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण १२१ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि विहित कालावधीमध्ये एकूण २९ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांची छाननी करुन लघुत्तम निविदाकारांबरोबर त्यांचे देकार कमी करण्याबाबत चर्चा केली असता सर्व लघुत्तम निविदाकारांनी निविदेचे दर कमी करण्यास असमर्थता दर्शविली. मात्र मे.जे.कुमार आणि चिराग कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.) यांनी काम क्र.५ करीता सादर केलेल्या लघुत्तम निविदेची टक्केवारी ०.५८% ने कमी करावयाची तयारी दर्शविली.

..१३/-

६.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, टप्पा-२ मधील काम क्र.१, ३ व ४ करीता मे.बी.पी.एल.- बी.बी.सी (जे.व्ही.) यांनी सादर केलेल्या निविदा लघुत्तम असून त्या निविदांचे दर अंदाजित खर्चापेक्षा अनुक्रमे २२.२०% कमी, ७.७७% जास्त व ११.११% जास्त आहेत. हे तीनही लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे, सुसंवादी व रास्त असल्यामुळे स्विकारण्यात यावेत अशी शिफारस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स यांनी केलेली आहे. त्यानुसार, हे तीनही लघुत्तम देकार स्विकारण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. मात्र बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, काम क्र.२, ५ व ६ साठी प्राप्त झालेल्या निविदा फारच जास्त दराच्या असल्याने सदर निविदा नाकारुन फेरनिविदा मागविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. काम क्र.१ साठी लघुत्तम देकार अंदाजित खर्चापेक्षा २२.२०% कमी दराचा असल्यामुळे संबंधित निविदाकाराकडून निविदा शर्तीप्रमाणे अतिरिक्त सुरक्षा ठेव (Additional Performance Security) घेण्यात येईल.

६.४ चर्चेदरम्यान, श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, काम क्र.२, ५ व ६ संबंधीच्या लघुत्तम निविदा नाकारावयाच्या असल्यामुळे या कामांतर्गत संरक्षक भिंत बांधण्याचे काम हाती घेण्यास काही कालावधी लागेल, म्हणून काम क्र.१, ३ व ४ अंतर्गत गाळ काढण्याचे काम करताना मिठी नदीच्या किना-यावरील भागाचे स्खलन (Slippage) होणार नाही याची दक्षता घ्यावी. यासंबंधात श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, अशा स्खलनापासून संरक्षण मिळविण्यासाठी Shoring वगैरे पर्यायांचा विचार करण्यात यावा.

६.५ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०२९</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

..१४/-

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सीएसटी पूलापर्यंत) वाढविण्याच्या कामांसाठी खालील तक्त्यानुसार अ.क्र.१, ३ व ४ येथील कामांच्या लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

| अ.क्र. | कामाचे नाव | लघुत्तम निविदाकारांचे नांव | लघुत्तम निविदेची टक्केवारी व रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या व माहिम कॉजवे ते धारावी पूलापर्यंत सा.क्र.०.०० मी. ते १२८० मी. मधील पात्राची रुंदी व खोली वाढवियाचे काम (अंदाजित खर्च रु.५७३०.०० लाख) | मे.बी.पी.एल.-बी.बी.सी. (जे.व्ही.) | (-)२२.२०% कमी दराने ४४,५७,९४,०००/- |
| ३. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीच्या लहान संगमपासून सी.एस.टी. पूलापर्यंत सा.क्र.१२८०.०० मी. ते ३३००.०० मी. मधील पात्राची रुंदी व खोली वाढविण्याचे काम (अंदाजित खर्च रु.४२२८.०० लाख) | मे.बी.पी.एल.-बी.बी.सी. (जे.व्ही.) | (+) ७.७७% अधिक दराने ४५,५६,५१,५६०/- |
| ४. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीच्या लहान संगमपासून सी.एस.टी. पूलापर्यंत सा.क्र.३३००.०० मी. ते ५९३०.०० मी. मधील पात्राची रुंदी व खोली वाढविण्याचे काम. (अंदाजित खर्च रु.८६४४.०० लाख) | मे.बी.पी.एल.-बी.बी.सी. (जे.व्ही.) | (+) ११.११% अधिक दराने ९६,०४,३४,८४०/- |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** खालील अ.क्र.२, ५ व ६ च्या कामांसाठी प्राप्त झालेल्या निविदा नाकारण्यास तसेच या कामांसाठी फेरनिविदा मागविण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे :-

(अ) <u>अ.क्र.२</u> : वांद्रे-कुर्ला संकुलातील वाकोला नाल्याच्या सा.क्र.६४५०.०० मी. ते २४३३.००मी. मधील पात्राची रुंदी व खोली वाढविणे व वाकोला नाल्याच्या बाजूला (सा.क्र.६४५.०० मी. ते २४३३.०० मी.) प्रिस्ट्रेस ॲंकर वापरुन डायफ्रॅम भिंत बांधण्याचे काम.

(ब) <u>अ.क्र.५</u> : वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीच्या बाजूला लहान संगमापासून सीएसटी पूलापर्यंत (सा.क्र.३३००.०० मी. ते सा.क्र.५९३०.०० मी.) व वाकोला नाल्याच्या बाजूला (सा.क्र.१६२५.०० मी. ते २४३३.०० मी.) संरक्षक भिंत बांधण्याचे काम.

(क) <u>अ.क्र.६</u> : वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीच्या लहान संगमापासून सीएसटी पूलापर्यंत मधील बाजूला (सा.क्र.३३००.०० मी. ते सा.क्र.५९३०.०० मी.) प्रिस्ट्रेड अँकर वापरुन डायफ्रेम भिंत बांधण्याचे काम.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.७</u> : <u>मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प : वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या छन्नमार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक करणे.</u>**

**७.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या छन्नमार्गावर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी डिसेंबर, २००६ मध्ये स्पेशल पर्पज व्हेईकल स्थापन करण्यात आली आहे. या प्रकल्पासंबंधीत सवलतीच्या करारामध्ये (Concession Agreement) नमूद केल्याप्रमाणे स्पेशल पर्पज व्हेईकलचे सवलतदार (Concessionaire) आणि प्राधिकरण यांच्या दरम्यान स्वतंत्रपणे आणि योग्यप्रकारे काम करण्याकरीता एका स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक करण्याकरीता पूर्व अर्हतेसाठी प्राधिकरणाने जागतिक स्तरावर स्वारस्याचे प्रस्ताव मागविले असता एकूण २२ प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावांचे मूल्यमापन केले असता ६ भागीदारी संस्था आवश्यक त्या अर्हतेच्या अटी पूर्ण करतात असे दिसून आले. या ६ भागीदारी संस्थांकडून देकार मागविले असता ४ संस्थांनी देकार सादर केले. या देकारांचे तांत्रिक मूल्यमापन केले असता वित्तीय देकार उघडण्याकरीता फक्त ३ भागीदारी संस्था पात्र ठरल्या. या ३ संस्थांपैकी मे.लुईस बर्जर इन्कॉ (युएसए) - राईट्स लिमिटेड (जे.व्ही.) यांचा रु.१४,९५,३७,७८९/- (अधिक सेवाकर) रक्कमेचा देकार लघुत्तम असून सदरील लघुत्तम देकार रास्त व निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

७.२ श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, स्वतंत्र अभियंत्याच्या नेमणूकीसाठी होणारा खर्च स्पेशल पर्पज व्हेईकल आणि प्राधिकरण यांनी ५०:५० या प्रमाणात करावयाचा आहे.

७.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.१०३०</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या छन्नमार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीकरीता स्वतंत्र अभियंता म्हणून लघुत्तम निविदाकार मे.लुईस बर्जर इन्कॉ (युएसए) - राईट्स लिमिटेड (जे.व्ही.) यांची रु.१४,९५,३७,७८९/- (अधिक सेवाकर) इतक्या फी वर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.८</u> : <u>मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प : चारकोप-वांद्रे-मानखुर्द या छन्नमार्गाकरीता अर्हतापूर्व दस्तऐवज (Pre-Qualification Documents) तयार करण्यासाठी मेसर्स राईट्स लिमिटेड या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.</u>**

८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, चारकोप-वांद्रे-मानखुर्द या छन्नमार्गावर बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा (BOOT) या तत्वावर सार्वजनिक-खाजगी सहभागाने मेट्रो रेल्वे प्रकल्प हाती घेण्यास दिनांक २८ सप्टेंबर, २००६ रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीत प्राधिकरणाने मान्यता दिली. त्यानंतर, या प्रकल्पास राज्य शासनाने नोव्हेंबर, २००६ मध्ये मान्यता दिली. केंद्र शासनानेही या प्रकल्पास तत्वतः

..१७/-

मान्यता दिली असून स्वारस्याचे प्रस्ताव मागविण्यास सुध्दा मान्यता दिली आहे. त्यानुसार, दिनांक १८ फेब्रुवारी, २००७ रोजी जागतिक स्तरावर स्वारस्याचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्याच्या दृष्टीने अर्हतापूर्व दस्तऐवज तयार करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळास विनंती केली असता त्यांनी असे सूचविले की, या कामासाठी मे.राईटस लि. या सल्लागार संस्थेचा उपयोग करुन घ्यावा. मे.राईटस लि. ही रेल्वे मंत्रालयाची अंगीकृत संस्था असून त्यांच्याकडे तज्ञ व कुशल कर्मचारीवर्ग आहे तसेच दिल्ली मेट्रो रेल्वे प्रकल्प व तत्सम प्रकल्पांचा त्यांना अनुभव आहे. या सर्व बाबींचा विचार करुन चारकोप-वांद्रे-मानखुर्द या छन्नमार्गाकरीता अर्हतापूर्व अधिसूचना आणि अर्हतापूर्व दस्तऐवज तयार करणे, प्राप्त झालेल्या स्वारस्याच्या देकारांच्या मूल्यमापन प्रक्रियेत प्राधिकरणास मदत करणे, अर्हताप्राप्त निविदाकारांची शिफारस करणे इत्यादी कामांकरीता मे.राईटस लि. या संस्थेची सल्लागार म्हणून एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.७.५ लाख (सर्व कर वगळून) इतक्या फी वर नेमणूक करण्यात आली असून आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

८.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०३१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या चारकोप-वांद्रे-मानखुर्द छन्नमार्गाकरीता अर्हतापूर्व अधिसूचना आणि अर्हतापूर्व दस्तऐवज तयार करणे, प्राप्त झालेल्या स्वारस्याच्या देकारांच्या मूल्यमापन प्रक्रियेत प्राधिकरणास मदत करणे, अर्हताप्राप्त निविदाकारांची शिफारस करणे इत्यादी कामांकरीता मे.राईटस लि. या संस्थेची सल्लागार म्हणून एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.७.५ लाख (रु.सात लाख पन्नास हजार मात्र) अधिक कर इतक्या फी वर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे."

..१८/-

**बाब क्र.९ : मुंबई पारबंदर छन्नमार्ग - मेट्रो प्रकल्प तयार करणे : सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मेसर्स राईट्स लिमिटेड या सल्लागाराची नेमणूक करण्यास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई पारबंदर जोडरस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतले आहे. तसेच या रस्त्यासंबंधीच्या विकिरण व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी मे.कन्सल्टींग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा.लि. यांची सल्लागार म्हणून प्राधिकरणाने नेमणूक केलेली आहे. मुंबई पारबंदर जोडरस्ता प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चाधिकार समितीने अशी सूचना केली आहे की, मुंबई पारबंदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी प्राधिकरणाने अभ्यास हाती घ्यावा. अशा अभ्यासासाठी मे.राईटस लि. यांच्याकडे तज्ञ व कुशल कर्मचारीवर्ग उपलब्ध असून अशा प्रकारच्या प्रकल्पांचा त्यांना अनुभव आहे. म्हणून, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सामुदायिक प्रवासासाठी मुंबई पारबंदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी तसेच या प्रकल्पाचे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाशी तसेच मुंबईतील उपनगरी रेल्वे सेवांबरोबर आणि कोकण रेल्वे प्रकल्पाशी एकात्मिकरण करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता मे.राईटस लि. यांची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.१६० लाख (सेवाकर वगळून) इतक्या फी वर जानेवारी, २००७ मध्ये नेमणूक करण्यात आली आहे व आता ही बाब कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. हा सविस्तर प्रकल्प अहवाल जून, २००७ मध्ये पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

९.२ यासंबंधात श्री.रामाराव, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी अशी सूचना केली की, दोन स्पेशल इकॉनॉमीक झोन्स, नवीन विमानतळ तसेच मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा नवी मुंबईत विस्तार इत्यादीसाठी सिडकोने नवी मुंबईत जागा राखून ठेवली असून या बाबींचाही प्राधिकरणाने हाती घेतलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाच्या अभ्यासात समावेश करण्यात यावा. या सूचनेस कार्यकारी समितीने मान्यता दिली व असे ठरविले की, या अतिरिक्त बाबींच्या अभ्यासाचा खर्च प्राधिकरणाने सिडकोकडून वसूल करावा.

..१९/-

९.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०३२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे सामुदायिक प्रवासासाठी मुंबई पारबंदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी तसेच या प्रकल्पाचे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाशी तसेच मुंबईतील उपनगरी रेल्वे सेवांबरोबर आणि कोकण रेल्वे प्रकल्पाशी एकात्मिकरण करण्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे.राईटस लि. या सल्लागार संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.१६० लाख (अधिक सेवाकर) इतक्या फी वर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सिडकोने सुचविलेल्या अतिरिक्त बाबींचा समावेश सदर अभ्यासात करण्यात यावा. तसेच या अतिरिक्त बाबींच्या अभ्यासासाठी येणारा खर्च सिडकोकडून वसूल करण्यात यावा.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावर दादर ते ठाणे दरम्यान बस मार्गिकेसाठी "अनमाऊंटेबल" कर्ब / दुभाजक पुरविणे आणि बसविण्याच्या कामाच्या लघुत्तम निविदेस मंजुरी मिळणेबाबत.**

**१०.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत दादर ते ठाणे दरम्यान प्रायोगिक तत्वावर रॅपिड ट्रान्झिट

सिस्टिमची अंमलबजावणी प्राधिकरणाने करावी असे राज्य शासनाने ठरविले आहे. त्यानुसार, सदर सिस्टिम यशस्वीपणे राबविण्यासाठी तसेच ही सिस्टिम इतर वाहनांच्या वाहतुकीपासून स्वतंत्र होण्यासाठी रेज्ड पेवमेंट मार्कर व रोड मार्किंगसह अनमाऊंटेबल कर्ब/दुभाजक बसविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, दादर ते ठाणे दरम्यान तसेच पश्चिम द्रुतगती महामार्गावर एकूण ४० बस थांब्याकरीता प्रत्येकी १५० मीटर याप्रमाणे एकूण ६ कि.मी. साठी हे कर्ब / दुभाजक प्रायोगिक तत्वावर बसवावयाचे आहेत. सदर कामाचा एकूण अंदाजित खर्च रु.१,५९,४५,०००/- इतका आहे. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ५ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीत केवळ २ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी मे.प्रकाश इंजिनिअर्स यांची अंदाजित खर्चाच्या ४.९९% कमी दराची म्हणजे रु.१,५१,४९,३४४/- इतक्या किंमतीची निविदा लघुत्तम आहे. सदर लघुत्तम देकार निविदेच्या सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१०.२** यासंबंधात श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, अशाप्रकारे उपयोगात आणावयाचे कर्ब/दुभाजक स्टॅन्डर्ड टेक्नीकल स्पेसिफिकेशन्स्नुसार तयार केलेले असावेत. तसेच इतर शहरातही याच प्रकारचे कर्ब/दुभाजक वापरण्यात यावेत. यासंबंधात श्री.मूर्ती, प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे सांगितले की, इंडियन रोड काँग्रेसने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रस्तावित कर्ब/दुभाजकांचे स्पेसिफिकेशन्स् तयार केली आहेत.

**१०.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०३३</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,

कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रथमतः पूर्व द्रुतगती महामार्गावर दादर ते ठाणे दरम्यान व नंतर पश्चिम द्रुतगती महामार्गवर बस मार्गिकेसाठी अनमाऊंटेबल कर्ब / दुभाजक पुरविणे आणि बसविणे या कामासाठी मे.प्रकाश इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% कमी दराची म्हणजे रु.१,५१,४९,३४४/- (रु.एक कोटी एक्कावन्न लाख एकोणपन्नास हजार तीनशे चव्वेचाळीस मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : बांधा, वापरा, हस्तांतरण करा या तत्वावर पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग, वांद्रे-कुर्ला संकुल आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर बस क्यू शेल्टर उभारण्यासाठी निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

**११.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावर तसेच वांद्रे-कुर्ला संकुल आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बस क्यू शेल्टरची उभारणी करण्याचे ठरविण्यात आले आहे. या बस क्यू शेल्टरच्या उभारणीसाठी व देखभालीसाठी येणारा खर्च निविदाकारांनी बस क्यू शेल्टरवर जाहिरात करुन भागवावयाचा आहे. बस क्यू शेल्टरच्या संकल्पचित्रास बेस्टच्या स्थायी समितीने, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदान समितीने तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील संयुक्त कार्यकृती समितीने मान्यता दिलेली आहे. अशाप्रकारे बस क्यू शेल्टरची उभारणी करण्यासाठी सवलतीचा कालावधी १० वर्षाचा असेल. या सवलतीच्या कालावधीमधून ९० दिवसांच्या बस क्यू शेल्टरच्या बांधकामाचा कालावधी वगळून जाहिरातीसाठी ३५६० दिवस उपलब्ध असतील. तसेच या सवलतीच्या कालावधीत बस क्यू शेल्टरवरील जाहिरातीचे हक्क निविदाकाराकडे असतील. प्रत्येक बस क्यू शेल्टरसाठी जाहिरातीचे क्षेत्र सुमारे ३०० चौ.फूट राहील तसेच या व्यतिरिक्त सुमारे

..२२/-

१३५ चौ.फूट क्षेत्र हे माहितीफलक लावण्यासाठी असेल. या बस क्यू शेल्टरसाठी प्राधिकरणाकडून भूईभाडे अधिभार लावण्यात येणार नाही. तसेच महाराष्ट्र शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमात सुधारणा केल्यानंतर या बस क्यू शेल्टरवर मालमत्ता कर आकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे बेस्टच्या बस क्यू शेल्टरवर ज्या दराने मूल्यनिर्धारण अधिभार आकारण्यात येतो त्याच दराने बृहन्मुंबई महानगरपालिका या बस क्यू शेल्टरवर सवलतीच्या कालावधीसाठी अधिभार आकारेल. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, बस क्यू शेल्टरची उभारणी करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देताना शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने अशी अट घातली आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता घेऊन बस क्यू शेल्टरच्या उभारणीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, निविदाकार व सार्वजनिक बांधकाम विभाग असा त्रिपक्षीय करारनामा करण्यात यावा. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, अशाप्रकारे बस क्यू शेल्टरची उभारणी करण्यासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. देकारपूर्व चर्चासत्रास एकूण १६ निविदाकार उपस्थित होते. देकारपूर्व बैठकीमध्ये ठरविल्याप्रमाणे पॅकेज-१ अंतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावर ६५ बस क्यू शेल्टरसाठी, पॅकेज-२ अंतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावर २६ बस क्यू शेल्टरसाठी तसेच पॅकेज-३ अंतर्गत वांद्रे-कुर्ला संकुल आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर ५० बस क्यू शेल्टरसाठी देकार मागविण्यात आले. त्यानुसार पॅकेज-१ साठी चार देकार प्राप्त झाले तर पॅकेज-२ आणि पॅकेज-३ साठी प्रत्येकी एक देकार प्राप्त झाला. प्राप्त निविदांचे मूल्यमापन केले असता पश्चिम द्रुतगती महामार्गावर ६५ बस क्यू शेल्टर उभारण्याठी मे.आरबीपीएल-आरपीपीएल (जे.व्ही.) यांचा रु.१६,५३,६०,०००/- इतक्या रक्कमेचा देकार सर्वोच्च आहे, पूर्व द्रुतगती महामार्गावर २६ बस क्यू शेल्टर उभारण्यासाठी प्राप्त झालेला मे.जे.सी.डिकॉक्स ॲडव्हरटायझिंग इंडिया प्रा.लि. यांचा एकमेव देकार रु.२,७८,७०,५८१/- इतक्या रक्कमेचा आहे. तसेच वांद्रे-कुर्ला संकुल आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर ५० बस क्यू शेल्टर उभारण्यासाठी प्राप्त झालेला मे.जे.सी.डिकॉक्स ॲडव्हरटायझिंग इंडिया प्रा.लि. यांचा एकमेव देकार रु.५,५७,४१,१६१/- इतक्या रक्कमेचा आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सदर तीनही देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे व रास्त असून हे तीनही देकार कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

११.२ चर्चेनंतर, कार्यकारी समितीने असे ठरविले की, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे निविदाकारांच्या निविदा स्विकारण्यात याव्यात. तथापि, सुरुवातीस प्रत्येक पॅकेजसाठी नमुना तत्वावर २ बस क्यू शेल्टर उभारण्यास संबंधीत निविदाकारास सांगण्यात यावे. बस क्यू शेल्टरचे नमुने योग्य प्रकारचे आहेत अशी खात्री झाल्यानंतरच उर्वरीत बस क्यू शेल्टरची उभारणी करण्यासंबंधी संबंधित निविदाकारांना सांगावे. मात्र अशाप्रकारे नमुना तत्वावर तयार केलेल्या बस क्यू शेल्टरचा दर्जा समाधानकारक नसल्यास संबंधीत निविदाकारांच्या निविदा रदद् करण्यात याव्यात.

११.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०३४</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर बस क्यू शेल्टर उभारण्यासाठी खालील देकार स्विकारण्यास मान्यता देत आहे :-

(अ) <u>पॅकेज-१</u> : पश्चिम द्रुतगती महामार्गावर ६५ बस क्यू शेल्टर उभारण्यासाठी मे.आरबीपीएल-आरपीपीएल (जे.व्ही.) यांचा रु.१६,५३,६०,०००/- या एक रकमी हप्त्याचा देकार.

(ब) <u>पॅकेज-२</u> : पूर्व द्रुतगती महामार्गावर २६ बस क्यू शेल्टर उभारण्यासाठी मे.जे.सी.डिकॉक्स ॲडव्हरटायझिंग इंडिया प्रा.लि. यांचा रु.२,७८,७०,५८१/- एक रकमी हप्त्याचा देकार, आणि

(क) <u>पॅकेज-३</u> : वांद्रे-कुर्ला संकुल आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्यावर ५० बस क्यू शेल्टर उभारण्यासाठी मे.जे.सी.डिकॉक्स ॲडव्हरटायझिंग इंडिया प्रा.लि. यांचा रु.५,५७,४१,१६१/- एक रकमी हप्त्याचा देकार.

तथापि, सुरुवातीस प्रत्येक पॅकेजसाठी नमुना तत्वावर २ बस क्यू शेल्टर उभारण्यास संबंधीत निविदाकारास सांगण्यात यावे. बस क्यू शेल्टरचे नमुने योग्य प्रकारचे आहेत अशी खात्री झाल्यानंतरच उर्वरीत बस क्यू शेल्टरची उभारणी करण्यासंबंधी संबंधित निविदाकारांना सांगावे.

मात्र अशाप्रकारे नमुना तत्वावर तयार केलेल्या बस क्यू शेल्टरचा दर्जा समाधानकारक नसल्यास संबंधीत निविदाकारांच्या निविदा रदद् करण्यात याव्यात.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्याकरीता अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.**

१२.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास तसेच सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्याकरीता मे.कन्सल्टींग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस (इंडिया) लि. या सल्लागारांची कार्यकारी समितीच्या मान्यतेने रु.४२ लाख इतक्या फी वर नेमणूक करण्यात आली आहे. या अभ्यासाच्या व्याप्तीत मध्य रेल्वेवरील ५७२ मीटर लांबीच्या रेल्वे वरपूलासह लाल बहादूर शास्त्री मार्ग ते पूर्व द्रुतगती महामार्गापर्यंत रस्त्याच्या आरेखनाचा समावेश होता. सदर रेल्वे वरपूलापासून लोकमान्य टिळक टर्मिनस व कुर्ला (पूर्व) येथील एस.जी.बर्वे मार्गास जोडणारा रस्ता तसेच लाल बहादूर शास्त्री मार्ग ते मिठी नदीपर्यंतचा भाग समाविष्ट करुन सल्लागारांस अतिरिक्त कामासाठी रु.३६.३६ लाख इतकी वाढीव फी देण्यास कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात आली. दरम्यानच्या काळात जागतिक बँकेच्या मान्यतेने सदर रस्त्याची रुंदी ३०.०० मीटर ऐवजी ४५.७० मीटर इतकी असावी असे ठरविण्यात आले. रस्त्याची रुंदी वाढविल्यामुळे म्हाडा वसाहतीजवळ साखळी क्र.२ + २१० कि.मी. ते २ + ७७५ कि.मी. मधील व्हायाडक व स्लीप रस्त्याची आणि जुन्या आग्रा रोडवरील प्रस्तावित लोखंडी पूलाऐवजी बो स्ट्रींग गर्डर पूलासाठी नवीन जनरल ॲरेंजमेंट ड्रॉईंग व डिझाईन तयार करणे आवश्यक झाले. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सदर अतिरिक्त कामासाठी मे.कन्सल्टींग इंजिनिअरिंग सर्व्हिसेस (इंडिया) लि. यांना रु.२५.५० लाख अधिक सेवाकर इतकी वाढीव फी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१२.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.१०३५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (दोन) व (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड यांना सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्यासाठी करावयाच्या अतिरिक्त कामासाठी रु.२५.५० लाख (अधिक सेवाकर) इतकी फी अदा करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "एच" व "आय" ब्लॉकमधील विविध नाल्यांतील गाळ उपसण्याच्या कामाची अंमलबजावणी करणे.**

**१३.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्र या संस्थेने शिफारस केल्याप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकुलातील "एच" व "आय" ब्लॉकमधील विविध नाल्यांतील गाळ पावसाळयापूर्वी काढून त्यांची पाणी निचरण्याची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. "एच" व "आय" ब्लॉकमधील नाले हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतून वाहत येऊन वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीला मिळतात, त्यामुळे या नाल्यांतील गाळ काढण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे. तथापि, यासंबंधात अंतिम निर्णय होईपर्यंत या नाल्यांमधील गाळ काढण्याचे काम प्राधिकरणाने करावे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे. त्या अनुषंगाने या नाल्यांतील गाळ काढण्याचे काम प्राधिकरणामार्फत दरवर्षी पावसाळयापूर्वी करण्यात येते. या नाल्यांतून उपसलेला गाळ

..२६/-

टाकण्यासाठी सध्या वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमध्ये जागा उपलब्ध नसल्यामुळे तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार उपसलेला गाळ दूर नेऊन टाकणे आवश्यक असल्यामुळे, शक्य असेल तेथे नाल्याच्या बाजूला कच्चा रस्ता तयार करण्याचे काम तसेच कच्चा रस्ता तयार करणे शक्य नसेल तेथे गाळ रस्त्यालगत आणून डम्पींग ग्राऊंडपर्यंत नेऊन टाकणे आवश्यक आहे. त्यानुसार २००७-०८ या वर्षात "एच" ब्लॉकमधील गाळ काढण्याच्या कामासाठी रु.३.६२ कोटी व "आय" ब्लॉकमधील गाळ काढण्याच्या कामासाठी रु.१.३९ कोटी इतका खर्च अपेक्षित असून या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

१३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, "एच" व "आय" ब्लॉकमधील गाळ काढण्याचे काम येत्या पावसाळयापूर्वी पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे या कामाच्या निविदा मागविल्यानंतर पात्र लघुत्तम निविदाकारांच्या निविदा स्विकारण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे अशी कार्यकारी समितीस विनंती आहे.

१३.३ त्यानंतर, वरील दोन्ही प्रस्तावांस मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०३६</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील "एच" व "आय" ब्लॉकमधील विविध नाल्यांतील गाळ उपसण्याच्या कामाच्या अनुक्रमे रु.३.६२ कोटी व रु.१.३९ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** "एच" व "आय" ब्लॉकमधील विविध नाल्यांतील गाळ उपसण्याच्या कामासाठी निविदा मागविल्यानंतर लघुत्तम निविदा स्विकारण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

..२७/-

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** "एच" व "आय" ब्लॉकमधील विविध नाल्यांतील गाळ उपसण्याच्या कामाच्या लघुत्तम निविदा स्विकारल्यानंतर त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे."

**बाब क्र.१४ : मिठी नदीच्या वांद्रे-कुर्ला संकुलामधील भागाचे (माहिम कॉजवे ते सीएसटी पूल) आणि संपूर्ण वाकोला नाल्याचे टोटल स्टेशन सर्वेक्षण करण्यासाठी मे.युनिक इंजिनिअर्स यांची नियुक्ती करण्यास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

**१४.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या शक्तीप्रदान समितीच्या दिनांक १३ फेब्रुवारी, २००७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये असे ठरविण्यात आले की, बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मिठी नदी व वाकोला नाल्याच्या प्रस्तावित रुंदीकरणाची हद्द निश्चित करावी. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने निविदा मागवून मे.युनिक इंजिनिअर्स या संस्थेची सीएसटी पूलाच्या उत्तरेकडील मिठी नदीच्या भागाचे प्लेन टेबल सर्वेक्षण करण्यासाठी प्रति कि.मी. रु.८४,२००/- या दराने नेमणूक केली. त्यानुसार प्राधिकरणानेसुध्दा मिठी नदीच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील भागासाठी व वाकोला नाल्यासाठी अशाप्रकारे सर्वेक्षण करणे आवश्यक असल्यामुळे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्वेक्षणाद्वारे गोळा केलेल्या माहितीशी प्राधिकरणाने मिळविलेली माहिती सुसंगत असावी या दृष्टीने प्राधिकरणानेही मे.युनिक इंजिनिअर्स या संस्थेची बृहन्मुंबई महानगरपालिकेने निश्चित केलेल्या प्रति कि.मी. रु.८४,२००/- या दरानेच नेमणूक केली आहे व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. या कामामध्ये सर्वेक्षण करणे व नदीची मध्यरेषा दर्शविणे; नदीची सध्याची रुंदी, केंद्रीय जल व विद्युत संशोधन केंद्राने शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावित रुंदी, नदीच्या दोन्ही बाजूला १०० मी. पर्यंतच्या भागातील बांधकामे दर्शविणे; सध्या अस्तित्वात असलेले पूल व लहान पूलाबाबत (कलव्हर्ट) सविस्तर माहिती दर्शविणे; प्रत्यक्ष काम करताना मिठी नदीच्या रुंदीकरणासाठी मध्यरेषेवर प्रत्येक ५० मी. वर हद्द दर्शविणे इत्यादींचा समावेश आहे. या सर्वेक्षणाचा अंदाजे

१० कि.मी. लांबीसाठी एकूण खर्च रु.८,४२,०००/- (सेवाकर वगळून) इतका असून सुमारे तीन आठवडयाच्या कालावधीत सदर काम पूर्ण करावयाचे आहे. तथापि, सर्वेक्षणाची अंतिम फी सर्वेक्षण केलेल्या प्रत्यक्ष लांबीवर अवलंबून राहील.

**१४.२** यासंबंधात श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या जल आरेखक (Hydrographer) यांनी तयार केलेल्या नकाशांशी मे.युनिक इंजिनिअर्स यांनी सर्वेक्षणाद्वारे तयार केलेल्या नकाशांची तुलना करावी व नकाशांची अचूकता तपासून पहावी. अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या सूचनेस मान्यता दिली.

**१४.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.१०३७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीचा माहिम कॉजवे ते सीएसटी पूलापर्यंतचा भाग व संपूर्ण वाकोला नाल्याचे टोटल स्टेशनद्वारे सर्वेक्षण करण्यासाठी मे.युनिक इंजिनिअर्स यांची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच प्रति कि.मी. रु.८४,२००/- या दराने अंदाजे १० कि.मी. लांबीसाठी एकूण रु.८,४२,०००/- (सेवाकर वगळून) इतक्या अंदाजित फी वर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे. सर्वेक्षणाची अंतीम फी सर्वेक्षण केलेल्या प्रत्यक्ष लांबीनुसार अदा करण्यात येईल.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या कामाचा आढावा घेण्यासाठी व सर्वेक्षण वेळेवर पूर्ण करुन घेण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : मुंबई व सभोवतालच्या परिसरात फॉर्मुला वन कार शर्यत प्रकल्पाचा मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्यामार्फत सल्लागार म्हणून रु.७० लाख एवढया ठराविक रकमेवर तसेच एकमेव स्त्रोत तत्वावर सुसाध्यता अभ्यास हाती घेण्याबाबत.**

**१५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई व सभोवतालच्या परिसरात फॉर्मुला वन कार शर्यत प्रकल्प हाती घेण्यासाठी सामाजिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी रु.७० लाख (कर वगळून) इतक्या सवलतीच्या दरात करण्याची तयारी दर्शविली असून या सल्लागार संस्थेची नेमणूक करावी अशी विनंती राज्य शासनाचे सचिव (विशेष प्रकल्प) यांनी प्राधिकरणास केली आहे. या संबंधात मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांनी सादर केलेला प्रस्तावही सचिव (विशेष प्रकल्प) यांनी प्राधिकरणाकडे पाठविला आहे. फॉर्मुला वन कार शर्यतीमुळे महाराष्ट्रात मोठया प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होईल अशी शासनाला अपेक्षा आहे. म्हणून सदर अभ्यासासाठी मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा.लि. यांची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.७० लाख (कर वगळून) इतक्या फी वर नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१५.२** चर्चेदरम्यान, श्री. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, फॉर्मुला वन कार शर्यत प्रकल्पाचे ठिकाण मुंबईबाहेर महानगर प्रदेशात असावे. तसेच श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की, या प्रकल्पाच्या ठिकाणाची सुगमताही (accessibility) तपासून पहाण्यात यावी. यासंबंधात श्री.संजय उबाळे, सचिव (विशेष प्रकल्प) यांनी असे स्पष्ट केले की, सल्लागारांनी तयार केलेला सुसाध्यता अभ्यासाचा अहवाल मंत्रिमंडळाकडे सादर करुन मंत्रिमंडळाच्या मान्यतेने प्रकल्पाचे ठिकाण निश्चित करण्यात येईल.

**१५.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०३८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई व सभोवतालच्या परिसरात फॉर्मुला वन कार शर्यत प्रकल्प हाती घेण्यासाठी सुसाध्यता अभ्यास करण्याकरीता मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस प्रा.लि. या संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.७० लाख (कर वगळून) इतक्या फी वर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१६ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ एप्रिल, २००६ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००६.**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक १ एप्रिल, २००६ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००६ पर्यंतच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.१७ : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष व इतर दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

**१७.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेचे सह-अध्यक्ष श्री.बिट्टू सहेगल तसेच दोन सदस्य श्री.रविंद्र सुळे व डॉ.एम.आर.अल्मेडा यांचा कालावधी दिनांक २३ फेब्रुवारी, २००७ रोजी समाप्त झाला आहे. महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीनुसार सदर संस्थेचे सह-अध्यक्ष म्हणून नामांकीत व्यक्तीचे नामनिर्देशन प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने करावयाचे असते. तसेच पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र, सागरीजीवन आणि भूदृश्ये (लँड स्केपिंग) हया क्षेत्रांमध्ये तज्ञ असलेल्या ३ विशेषज्ञ व्यक्तींचे सभासद म्हणून नामनिर्देशन प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने करावयाचे असते. अशा नामनिर्देशित सदस्यांचा कालावधी ३ वर्षाचा असतो. त्यानुसार महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर रिक्त झालेल्या सह-अध्यक्ष व इतर दोन सदस्यांचे जागी नामनिर्देशन करण्यात यावे अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली आहे.

१७.२ चर्चेनंतर, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर रिक्त झालेल्या सह-अध्यक्ष व दोन सदस्यांचे जागी नव्याने नामनिर्देशन करण्याचे अधिकार कार्यकारी समितीने शासनाचे मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना प्रदान केले. कार्यकारी समितीने असेही ठरविले की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेचा विकास करण्याच्या दृष्टीने सल्लागारांच्या मदतीने एक प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा.

**बाब क्र.१८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकींना राज्य शासनाचे सचिव (विशेष प्रकल्प) यांना "विशेष निमंत्रित" म्हणून बोलाविण्याबाबत.**

१८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, राज्य शासनाचे सचिव (प्रशासकीय पुनर्रचना व विशेष प्रकल्प) यांनी प्रस्तावित केले आहे की, मुंबईत हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांपैकी अनेक प्रकल्प प्राधिकरणामार्फत राबविले जातात. परंतु सचिव (विशेष प्रकल्प) हे कार्यकारी समितीचे सदस्य नसल्याने त्यांना या योजनांच्या सद्यस्थितीबाबत माहिती मिळत नाही, म्हणून कार्यकारी समितीवर सचिव (विशेष प्रकल्प) यांचा समावेश करण्यात यावा. सदर प्रस्तावास मा.मुख्यमंत्री ह्यांनी मान्यता दिलेली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १०-अ अन्वये शासनाच्या अधिका-यास "विशेष निमंत्रित" म्हणून कार्यकारी समितीच्या बैठकींना बोलाविता येते, मात्र त्यापूर्वी त्याबाबतचा ठराव कार्यकारी समितीने पारीत करणे आवश्यक आहे. म्हणून कार्यकारी समितीच्या आगामी बैठकींना राज्य शासनाचे सचिव (विशेष प्रकल्प) यांना "विशेष निमंत्रित" म्हणून बोलाविण्याच्या प्रस्तावास अध्यक्ष, कार्यकारी समिती यांची पूर्वमान्यता घेण्यात आली व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

१८.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०३९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १०-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास

सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे, मूलतः मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे सदस्य नसलेले राज्य शासनाचे सचिव (विशेष प्रकल्प) यांना कार्यकारी समितीच्या बैठकींना "विशेष निमंत्रित" म्हणून बोलाविण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे."

**बाब क्र.१९ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ नोव्हेंबर, २००६ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २००७.**

दिनांक १ नोव्हेंबर, २००६ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २००७ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.२०: (अ) दिनांक ३०.०९.२००६ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

**(ब) दिनांक ३१.१२.२००६ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २००६ रोजी संपणा-या तसेच दिनांक ३१ डिसेंबर, २००६ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.२१ : श्री.व्ही.शिवकुमारन, सेवानिवृत्त सदस्य (वित्त), रेल्वे बोर्ड यांची प्राधिकरणामध्ये नेमणूक करण्याबाबत.**

**२१.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, श्री.व्ही.शिवकुमारन हे सदस्य (वित्त), रेल्वे बोर्ड या पदावरुन सेवानिवृत्त झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने त्यांची सल्लागार (Mass Rapid Transit & Toll Monitoring Unit) म्हणून नेमणूक केली. या प्राधिकरणास सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणा (एम.आर.टी.एस.) प्रकल्पाकरीता एका सेवानिवृत्त रेल्वे अधिका-याच्या सेवेची आवश्यकता असल्यामुळे श्री.शिवकुमारन यांची अंशकालीन तत्वावर सल्लागार (एम.आर.टी.एस.) म्हणून नेमणूक करण्यास अध्यक्ष, कार्यकारी समिती यांची मान्यता घेण्यात आली. त्यानुसार श्री.शिवकुमारन यांची

..३३/-

भाडेतत्वावर एक आठवडयातून तीन दिवस अर्धवेळकरीता तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून त्यांना देण्यात येणा-या एकत्रित वेतनाच्या (वाहनचालकाच्या वेतनासह) ५०% रक्कमेची प्रतिपूर्ती प्राधिकरणाने करण्यासापेक्ष नेमणूक करण्यात आली. त्यानुसार, श्री.शिवकुमारन यांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून दिनांक १.१२.२००२ ते दिनांक ३१.१२.२००५ या कालावधीत देण्यात आलेल्या वेतनाच्या (वाहनचालकाच्या वेतनासह) ५०% म्हणजे रु.५,६०,७८५/- इतक्या रकमेची प्राधिकरणामार्फत प्रतिपूर्ती करावयाची आहे. सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्याची विनंती कार्यकारी समितीस करण्यात आली आहे. तसेच श्री.शिवकुमारन यांची प्राधिकरणामध्ये दिनांक २३ मार्च, २००६ पासून एम.आर.टी.एस. प्रकल्पाकरीता विशेष कार्य अधिकारी या पदावर मासिक रु.३०,०००/- अधिक रु.५०००/- (शिपाई, वर्तमानपत्रे व इतर खर्चासाठी) इतक्या एकत्रित वेतनावर एक वर्षाच्या कालावधीकरीता कंत्राट पध्दतीवर व पूर्णवेळ नेमणूक करण्यात आली आहे. तसेच श्री.शिवकुमारन यांना कार्यालयीन कामाकरीता आणि कार्यालय ते निवासस्थानापर्यत जाण्या-येण्याकरीता वातानुकुलीन वाहन तसेच मोबाईल फोन उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर नेमणूकीसही कार्योत्तर मंजूरी देण्याची विनंती कार्यकारी समितीस करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे श्री.शिवकुमारन यांच्या नेमणूकीस त्यांच्या सध्याच्या वेतनानुसार आणि इतर सुविधांसह दिनांक ३१ मार्च, २००८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे प्रस्तावित आहे.

**२१.२** त्यानंतर, वरील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०४० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे श्री.व्ही.शिवकुमारन, सेवानिवृत्त सदस्य (वित्त), रेल्वे बोर्ड यांची सेवा भाडेतत्वावर दिनांक ०१ डिसेंबर, २००२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २००५ पर्यंतच्या

कालावधीकरीता प्राधिकरणाने उपयोगात आणल्याबद्दल एकूण रु.५,६०,७८५/- इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला अदा करण्यास तसेच श्री.शिवकुमारन यांची दिनांक २३ मार्च, २००६ पासून प्राधिकरणामध्ये एम.आर.टी.एस. प्रकल्पाकरीता विशेष कार्य अधिकारी या पदावर मासिक रु.३०,०००/- अधिक रु.५,०००/- (शिपाई, वर्तमानपत्रे व इतर खर्चासाठी) इतक्या एकत्रित वेतनावर एक वर्षाच्या कालावधीकरीता कंत्राट पध्दतीवर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे. एम.आर.टी.एस. प्रकल्पाकरीता विशेष कार्य अधिकारी म्हणून श्री.शिवकुमारन् यांना कार्यालयीन कामाकरीता तसेच कार्यालय ते निवासस्थानापर्यंत जाण्या-येण्याकरीता वातानुकुलीन वाहन तसेच मोबाईल फोन या सुविधा देय असतील.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** श्री.शिवकुमारन यांच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक ३१ मार्च, २००८ पर्यंत वाढविण्यासही याद्वारे मान्यता देण्यात येत आहे."

**बाब क्र.२२ : महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडून प्रतिनियुक्तीवर असलेले श्री.एन.एस.कोळंबेकर व श्री.आर.बी.पाटणकर यांना प्राधिकरणाच्या सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत.**

**२२.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळातील श्री.एन.एस.कोळंबेकर, कनिष्ठ अधिकारी व श्री.आर.बी.पाटणकर, नाईक यांनी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळातून ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतली आहे. त्यानंतर, अध्यक्ष, कार्यकारी समिती यांची मान्यता घेऊन श्री.कोळंबेकर यांची या प्राधिकरणात रु.५०००-१५०-८००० या वेतनश्रेणीतील सहाय्यक या पदावर व श्री.पाटणकर यांची रु.२५५०-३२०० या वेतनश्रेणीतील शिपाई या पदावर दिनांक ३ जानेवारी, २००७ पासून कायमस्वरुपी पुनर्नेमणूक केलेली आहे व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. श्री.कोळंबेकर यांचे सध्याचे वय ४५ वर्षे व श्री.पाटणकर यांचे सध्याचे वय ४८ वर्षे असल्यामुळे त्यांच्या प्राधिकरणातील पुनर्नियुक्तीकरीता सेवाप्रवेश नियमामधील कमाल वयाची अट शिथिल करावी लागेल. तसेच श्री.कोळंबेकर व श्री.पाटणकर यांची प्राधिकरणामध्ये पुनर्नियुक्ती केल्यामुळे त्यांना महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळातील मागील सेवेचे कोणतेही फायदे देय असणार नाहीत.

..३५/-

२२.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०४१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी नेमणूक मार्गदर्शक तत्वे, १९८४ च्या नियम २ अनुसार कार्यकारी समिती याद्वारे श्री.एन.एस.कोळंबेकर यांची प्राधिकरणातील रु.५०००-१५०-८००० या वेतनश्रेणीतील सहाय्यक या पदावर व श्री.आर.बी.पाटणकर यांची रु.२५५०-३२०० या वेतनश्रेणीतील शिपाई या पदावर दिनांक ०३ जानेवारी, २००७ (म.पू.) पासून करण्यात आलेल्या कायमस्वरुपी पुनर्नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देत आहे. तसेच श्री.कोळंबेकर व श्री.पाटणकर यांची प्राधिकरणामध्ये पुनर्नेमणूक करण्याकरीता सेवाप्रवेश नियमामधील कमाल वयाची अट शिथिल करण्यास मान्यता देत आहे. श्री.कोळंबेकर व श्री.पाटणकर यांची प्राधिकरणामध्ये पुनर्नेमणूक केल्यानंतर महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळातील मागील सेवेचे कोणतेही फायदे त्यांना देय असणार नाहीत."

**बाब क्र.२३ : मुंबई नागरी पायाभूत प्रकल्पांतर्गत एस.व्ही.रोड ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत मिलन सबवे वरुन प्रस्तावित उड्डाणपूलाच्या कामास सुधारीत प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

२३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मिलन सबवे हा सखोल भागात असल्याने प्रत्येक पावसाळयात या ठिकाणी पाणी साचते तसेच हा सबवे अरुंद असल्याने त्या भागात नेहमी वाहतूकीची कोंडी होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखडयानुसार (डी.पी.) मिलन सबवे पासून २०० मी. उत्तरेस, ३९.६० मी. रुंदीचा डी.पी. रोड प्रस्तावित आहे. परंतु या रस्त्याच्या संरेखनामध्ये अनेक झोपडया असल्याने त्या रस्त्यावर रेल्वे वरपूल बांधणे शक्य नाही. या झोपडया भविष्यामध्ये हलविल्यानंतर त्या ठिकाणी अजून एक रेल्वे वरपूल बांधणे शक्य होईल. म्हणून आता मिलन सबवेवरुन उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित केले आहे. मिलन सबवेसमोर मुंबई विमानतळाची धावपट्टी येत असल्याने मिलन सबवेवरुन उड्डाणपूल बांधण्यासाठी आंतरराष्ट्रीय विमान पतन प्राधिकरणाची मंजूरी आवश्यक आहे. त्यादृष्टीने पाठपूरावा करुन तसेच उड्डाणपूलाच्या संकल्पनामध्ये

आवश्यकतेनुसार बदल करुन उड्डाणपूल बांधण्यास आंतरराष्ट्रीय विमान पतन प्राधिकरणाची मंजूरी मिळालेली आहे. या उड्डाणपूलाच्या कामाबरोबरच एस.व्ही.रोड पासून मिलन सबवे पर्यंतच्या १८.३ मी. जोडरस्त्याचे रुंदीकरण, त्यालगतचा नाला रस्त्याच्या कडेला सरकवून त्याचे बॉक्स टाईप नाल्यात बांधकाम करणे तसेच पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या सर्व्हिस रोड लगतच्या १८.३ कि.मी. डी.पी. रोडचे बांधकाम प्रस्तावित आहे. या उड्डाणपूलाची एकूण लांबी ८०० मीटर व रुंदी ८ मीटर इतकी असेल. या उड्डाणपूलाच्या बांधकामामुळे मिलन सबवेच्या उत्तरेला डी.पी. रस्त्याच्या आखणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच रस्त्याच्या रुंदीकरणामुळे बाधित होणा-या लोकांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता उड्डाणपूलाचे बांधकाम टप्प्याटप्प्याने करण्यात येईल. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मिलन सबवे उड्डाणपूलाचा सुधारीत अंदाजित खर्च रु.३३.०० कोटी इतका असून या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या उड्डाणपूलाचे बांधकाम मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेण्यात येईल.

**२३.२** चर्चेदरम्यान, श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, या भागातील वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने मिलन सबवेवरील प्रस्तावित उड्डाणपूलाची रुंदी ८ मीटर ऐवजी १२ मीटर इतकी असणे आवश्यक आहे.

**२३.३** वरील सूचना मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०४२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,

कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत एस.व्ही.रोड ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत मिलन सबवे वरील उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या रु.३३.०० कोटी इतक्या सुधारीत अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे. या उड्डाणपूलाची रुंदी ८ मीटर ऐवजी १२ मीटर इतकी असावी."

**<u>बाब क्र.२४</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - प्राधिकरणाची व इतर अंमलबजावणी करणा-या संस्थांची पर्यावरणीय व्यवस्थापन क्षमता वाढविण्यासाठी मे.ईआरएम इंडिया या सल्लागाराची एक वर्षाकरीता पुनर्नेमणूक करणेविषयी.</u>**

२४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना सह महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जागतिक बँकेच्या सूचनेनुसार मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची अंमलबजावणी करणा-या संस्थांच्या पर्यावरण व्यवस्थापन क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने जागतिक बँकेच्या निवड पध्दतीनुसार तसेच कार्यकारी समितीच्या मान्यतेने ऑगस्ट, २००३ मध्ये मे.ई.आर.एम.इंडिया, नवी दिल्ली या सल्लागार संस्थेची प्राधिकरणाने नेमणूक केली होती. यासंबंधात सदर सल्लागारांसमवेत ऑगस्ट, २००३ ते ऑगस्ट, २००४ या एका वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राट केले होते व त्यामध्ये आवश्यकता भासल्यास कंत्राट पुढे चालू ठेवण्याची तरतूद होती. त्यानुसार सदर सल्लागारांच्या नेमणूकीचा कालावधी ३ महिन्याने वाढविण्यात आला होता व सदर कंत्राट पूर्ण झाले होते. त्यानंतर सुधारीत कामाच्या शर्ती पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता जागतिक बँकेने मान्य केल्या. जागतिक बँकेच्या शिफारशीनुसार मे.ई.आर.एम.इंडिया यांची एकमेव स्त्रोत या तत्वावर आणखी एका वर्षासाठी पुनर्नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. पूनर्नेमणूकीसाठी रु.४२,०२,०००/- अधिक रु.२,९२,७३९/- सेवाकर इतकी फी मे.ई.आर.एम.इंडिया यांना देण्यास जागतिक बँकेने संमती दिली आहे. या रक्कमेपैकी ८०% रक्कम जागतिक बँकेकडून कर्जरुपाने उपलब्ध होईल व उर्वरीत २०% रक्कम संबंधीत कार्यान्वयन संस्थांकडून त्यांच्या कर्जाच्या प्रमाणानुसार वसूल करण्यात येईल.

..३८/-

२४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१०४३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम ३ चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसेच मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या इतर कार्यान्वयन संस्थांना तांत्रिक सहाय्य पुरविण्याकरीता मे.इ.आर.एम.इंडिया लि. या सल्लागार संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.४२,०२,०००/- अधिक रु.२,९२,७३९/- सेवा कर इतक्या फी वर आणखी एका वर्षासाठी नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र.१ : वांद्रे-कुर्ला संकुलामधील कलानगर जंक्शन ते एमटीएनएल जंक्शन पर्यंतच्या ४५ मीटर रुंद रस्त्याचे मजबूतीकरण करण्याचे कामासाठी प्रशासकीय मान्यता व निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील ४५ मीटर रुंदीचा रस्ता १५ वर्षापूर्वी बांधण्यात आला असून या रस्त्यावरील वाहतूकीत मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे या रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग वारंवार खराब होतो. म्हणून हा रस्ता कॉंक्रीटीकरणाद्वारे मजबूत करणे आवश्यक आहे. या कामासाठी मे. स्टूप कन्सल्टंटस् यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून या सल्लागारांनी आवश्यक त्या चाचण्या, सर्वेक्षण व सविस्तर अभ्यास करुन रस्त्याचे डिझाईन तयार केले आहे. या सल्लागारांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे वांद्रे-कुर्ला संकुलातील

कलानगर जंक्शन ते एम.टी.एन.एल. जंक्शन या भागातील सुमारे ३.५० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे व उरलेल्या भागात इंटरलॉकींग पेवर ब्लॉक बसविणे या कामाचा अंदाजित खर्च रु.३२.७७ कोटी इतका आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे तसेच पदपथाचे काम यापूर्वीच पूर्ण करण्यात आले आहे. या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण १५ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ७ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. या निविदांची छाननी केली असता ४ निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.महावीर रोडस् ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.७१% कमी दराची म्हणजे रु.२७५५.३३ लाख किंमतीची निविदा लघुत्तम आहे. सदर लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असून सदर देकार स्विकारण्यात यावा अशी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी शिफारस केलेली आहे. म्हणून, सदर लघुत्तम देकार कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.७१% कमी दराचा असल्यामुळे संबंधीत निविदाकाराकडून अतिरिक्त सुरक्षा ठेव घेण्यात येईल. या कामाचा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करावयाचा असून काम पूर्ण करण्याचा कालावधी १२ महिने इतका आहे.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०४४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम ३ चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील कलानगर जंक्शन ते एम.टी.एन.एल. जंक्शन

पर्यंतच्या ४५ मीटर रुंद रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याच्या कामासाठी रु.३२.७७ कोटी (रुपये बत्तीस कोटी सत्याहत्तर लाख मात्र) इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील कामासाठी मे.महावीर रोडस् अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची रु.२७५५.५३ लाख (रुपये सत्तावीस कोटी पंचावन्न लाख त्रेपन्न हजार मात्र) इतक्या किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**पटल बाब क्र.२ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन वसाहतीत प्रकल्पग्रस्तांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनोत्तर कामाचे नियोजन व अंमलबजावणी करणेसाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन वसाहतीत प्रकल्पग्रस्तांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनोत्तर कामाचे नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे यासाठी मे.जे.पी.एस.असोसिएटस् प्रा.लि. यांची सल्लागार म्हणून रु.५३,३३,६०४/- (सेवाकर व विमा खर्चासह) इतक्या फी वर नेमणूक करण्यास कार्यकारी समितीने दिनांक २१ नोव्हेंबर, २००६ रोजी झालेल्या २१८ व्या बैठकीत मान्यता दिली होती. त्यानंतर सदर संस्थेस करारनामा करण्याबाबत विनंती केली असता त्यांनी सदर काम करण्यास असमर्थता व्यक्त केली. सदर कामासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत जागतिक बँकेने तगादा लावल्यामुळे पूर्वी प्राप्त झालेल्या निविदांमधील दुस-या क्रमांकावरील सल्लागार मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांचेशी या कामासंबंधात वाटाघाटी करण्यात आल्या. प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करुन साधारणपणे २ वर्षाचा कालावधी लोटला असून ब-याच प्रमाणात

..४१/-

पुनर्वसनोत्तर काम झाले असल्यामुळे आता सल्लागाराने करावयाच्या कामाच्या व्याप्तीत अल्प प्रमाणात सुधारणा करण्यात आली व त्यानुसार सुधारीत देकार देण्याविषयी मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांना सांगण्यात आले. त्यानुसार मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांनी रु.६९,००,०००/- (सेवाकर व इतर कर वगळून) इतक्या फी चा सुधारीत देकार सादर केला आहे. या सुधारीत देकारास जागतिक बँकेची मान्यता मिळेल या अपेक्षेने मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या सल्लागारांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या सल्लागारांच्या नेमणूकीचा खर्च सुरुवातीस प्राधिकरणाच्या निधीतून करण्यात येईल व त्याची १००% प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून कर्जरुपाने करण्यात येणार आहे. या कर्जाच्या रक्कमेची परतफेड महाराष्ट्र शासन, रेल्वे व बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्रकल्पग्रस्तांच्या संख्येनुसार करण्यात येईल.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास, जागतिक बँकेच्या मान्यतेच्या अधीन राहून, कार्यकारी समितीने मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :—

**<u>ठराव क्र.१०४५</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम ३ चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन वसाहतीत प्रकल्पग्रस्तांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनोत्तर कामाचे नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे यासाठी मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, दिल्ली या सल्लागारांची रु.६९,००,०००/- (रुपये एकोणसत्तर लाख मात्र) (सेवाकर व इतर कर वगळून) इतक्या फी वर नेमणूक करण्यास, जागतिक बँकेच्या मान्यतेच्या अधीन राहून, मान्यता देत आहे.

..४२/-

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** जागतिक बँकेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooooo ———